T91541/2021 दि. 17.8.2021


# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११०१८

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी ISO ९००१-२००८ प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

## भुमि आणि जिंदगी विभाग

दुरध्वनी क्र. : ०२०-६७३३१५३७ E-mail :Landestate@pcmcindia.gov.in

फॅक्स क्र. : ०२०-२७४२५६०० Website : www.pcmcindia.gov.in


43

जावक क्र. : भूजि/९/कावि /७८७ /२०२१ दिनांक: १७ /०८ /२०२१

वाचले :

१.क्र.भूजि/०९/कावि/२२२/२०१९ दि. ०१/०८/२०१९

२.क्र.नावियो/०९/कावि/११/२०२१ दि. १७/०२/२०२१

३.मा.आयुक्त सो. यांचा दि. १७ /०८/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव.

विषय : दीनदयाळ अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्र-२ यासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत...

आदेश,

वाचले क्र. १ अन्वये पिंपरी भाजी मंडई येथील पहिल्या मजल्यावरील गाळा क्र. ४३ ते ४९ असे एकूण ७ गाळे नागरवस्ती विकास योजना विभागास जूने रेकॉर्ड ठेवणेकामी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

वाचले क्र. २ अन्वये शहर प्रकल्प अधिकारी तथा उपायुक्त, नागरवस्ती विकास योजना विभाग यांनी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्र – २ यासाठी पिंपरी भाजी मंडई येथील पहिल्या मजल्यावरील रात्र निवारा केंद्राजवळील गाळा क्र. ४३ ते ४९ असे रिक्त असलेले ७ गाळे व उर्वरित रिक्त गाळे क्र. ११ ते २६ = १६ असे एकूण २३ गाळे निवासी बेघरांना निवारा कालबध्द कृती आराखडा यासाठी मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, स्थापत्य “अ” क्षेत्रीय कार्यालय यांनी सदर जागेची पाहणी करुन सदरचे गाळे नागरी बेघर व्यक्तींसाठी योग्य आहेत असे कळविले आहे.

सबब, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८, वाचले क्र. १ ते ३ च्या अनुषंगाने नागरवस्ती विकास योजना विभागास दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या शहरी बेघर निवारा केंद्र – २ यासाठी पिंपरी भाजी मंडई येथील पहिल्या मजल्यावरील रात्र निवारा केंद्राजवळील गाळा क्र. ४३ ते ४९ = ७ गाळे व उर्वरित रिक्त गाळा क्र. ११ ते २६ = १६गाळे असे एकूण २३ (प्रत्येकी क्षेत्रफळ ९९.८३ चौ. फुट) गाळे उपलब्ध करुन देण्यास मान्यता देत आहे. उपरोक्त वाचले क्र. १ चा आदेश रदद करणेत येत आहे.

17/08/21

(राजेश पाटील)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका.